Date : 15-Nov-2005 Edition : Mumbai Page No.: 8 Page Name: Economic Times Size: 100%

Sector: IT Circulation: 223224 AVE: Rs.8278.33 Frequency: Daily

Publication: Maharashtra Times Title: Article Related to Asiatotal.net Author Unknown

महाराष्ट्र टाइम्स

# स्पॉन्सरर्सच्या सहाय्याने फुकटात कम्प्युटर? शक्य आहे!

- 'एशियाटोटल डॉट नेट' या हाँगकाँगमधल्या कंपनीची कम्प्युटर मोफत देण्याची योजना
- योजना राबविण्यासाठी स्पॉन्सरर्सचा सहभाग अपेक्षित
- दोन लाख 'स्पॉन्सर्ड' कम्प्युटर ब्राझिलमध्ये धाडण्यासाठी तयार

***मुंबई ( म. टा. व्यापार प्रतिनिधी ):*** वेगवेगळी सॉफ्टवेअर्स लोड करुन सुविधांनी सज्ज असा कम्प्युटर फुकटात मिळाला तर कसे वाटेल? अर्थात आपल्या देशात सध्या तरी ही कविकल्पना असली तरी येत्या काळात असा प्रयोग अशक्य नसल्याचे संकेत मिळत आहेत. उद्योगधंद्याच्या, अन्य कामांच्या गरजा पूर्ण करणारा व इंटरनेट जोडणीच्या उद्देशाने बनवलेला कम्प्युटर फुकटात देण्याचा प्रयोग हाँगकाँगमधील एका कंपनीने केला आहे. 'एशियाटोटल डॉट नेट' या हाँगकाँगमधल्या कंपनीने स्वतःच्या ब्रँडचा 'आयटी' या नावाने ओळखला जाणारा कम्प्युटर मोफत देण्याची योजना सुरू केली आहे. ही आपली योजना एक व्यवसाय म्हणूनही लाभधारक होईल असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे.

ग्राहकांना फुकटात मिळणाऱ्या कम्प्युटरच्या या मॉडेलमध्ये कंपनीने स्पॉन्सरर्सना त्यांच्या उत्पादनांची माहिती ग्राहकांना देता यावी म्हणून विशिष्ट योजना केली आहे. त्यासाठी कंपनीने कम्प्युटरच्या की-पॅडवर काही बटणे दिली आहेत. ज्यांच्या सहाय्याने 'एशियाटोटल डॉट कॉम'च्या या योजनेतील स्पॉन्सरर्सच्या जाहिराती, माहिती, लोगो आदी बाबी स्क्रीनवर झळकतात. पण या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते ग्राहक किंवा इंटरनेटचा वापर करणाऱ्या व्यक्ती जाहिरात, माहिती आदी बघण्यासाठी या बटणांचा उपयोग करण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. त्यामुळे या योजनेचा फायदा स्पॉन्सरर्सना होईल असे त्यांना वाटत नाही. याबरोबरच हे कम्प्युटर्स इंटरनेट कनेक्शनसाठी 'डायल अप नेटवर्क'चा वापर करतात तर सध्या बहुतेक इंटरनेट कनेक्शन्स ब्रॉडबँडच्या माध्यमातून देण्यात येतात. 'एशियाटोटल डॉट नेट'चे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर जुडी चेन म्हणाले की,

कुठल्या ग्राहकांना या योजनेत मोफत कम्प्युटर द्यायचा, याची निवड 'एशियाटोटल डॉट नेट' करणार आहे. निवडीसाठी कंपनीचे निकष अत्यंत साधे आहेत. त्यासाठी ग्राहकाकडे टेलिफोन हवा, त्याच्याकडे कम्प्युटर असता कामा नये आणि तो अल्प उत्पन्न गटातला असणे आवश्यक आहे. ही योजना राबवण्यासाठी कंपनीने याआधीच ब्राझिलमध्ये लक्ष केंद्रित केले असून, तेथे १० लाख कम्प्युटर पाठवण्यात येणार आहेत. यापैकी पोस्टल व टेलिकॉम खात्यांची स्पॉन्सरशिप मिळालेले दोन लाख कम्प्युटर ब्राझिलमध्ये धाडण्यासाठी तयार ठेवण्यात आले आहेत. याबरोबरच चीनमध्येही आपण प्रवेश केला असल्याचा दावा 'एशियाटोटल डॉट नेट'ने केला आहे.

ही योजना स्पॉन्सर करु इच्छिणाऱ्या भागीदारांच्या शोधात आपण असल्याचेही श्री. चेन यांनी सांगितले. हे भागीदार शैक्षणिक, वैद्यकीय, आर्थिक व मनोरंजन या क्षेत्रातील कंपन्या असण्याची शक्यता व्यक्त करताना, यासंदर्भात बाजाराची कुठलीही पाहणी अद्याप करण्यात आली नसल्याचेही त्यांनी सांगितले. 'एशियाटोटल डॉट नेट'ने तैवानमधील कंपन्यांकडून आपल्या कम्प्युटरची रचना तयार केली असून, प्रत्यक्षात उत्पादन चीनबाहेर करण्यात येत आहे. निवडक ग्राहकांना फुकटात व पाच वर्षांच्या वॉरंटीसह देण्यात येणारा,




इंटरनेटची जोडणी ग्राहक घेईल या उद्देशाने बनवण्यात आलेला हा कम्प्युटर खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

मोफत देण्यात येणाऱ्या प्रत्येक कम्प्युटरच्या निर्मितीखर्चामध्ये स्पॉन्सरर्सचा सहभाग असून उत्पन्नात भागीदारी या तत्त्वावर हा व्यवसाय चालवण्यात येणार आहे.

सध्या हाँगकाँगमधील कंपनी हा प्रयोग करत असून हा प्रयोग यशस्वी झाला, तर कदाचित भारतातही हा प्रयोग राबवला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



© Maharashtra Times http://mahharashtratimes.india